।। सा विद्या या विमुक्तये ।।
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

**Office of the Director of Examinations & Evaluation Board**
**Phone: (02462)229294** **website: srtmun.ac.in** **E-mail: srtmuncoe@gmail.com**
**FAX No: (02462) 229520**

जा.क्र.संपवमुमं/परिपत्रक/२०१६-१७/१९०७ दि. ०७/०३/२०१७.

**परिपत्रक**

प्रति,
**मा. प्राचार्य / केंद्र प्रमुख**
सर्व उन्हाळी परीक्षा केंद्र २०१७
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : **उन्हाळी २०१७ परीक्षेचे प्रश्नपत्रिका ऑनलाईन पाठविणे व उत्तरपुस्तीकेच्या मुल्यांकनकार्याबाबत.**
संदर्भ : जा.क्र.पनिका/परीक्षातारखा/उन्हाळी२०१७/२०१६-१७/१४८९, दि. ०१/०२/२०१७.

महोदय,

उपरोक्त विषय व संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा दि. १५/०३/२०१७, २१/०३/२०१७ व दि. ११/०४/२०१७ पासुन सुरु होत आहेत. सदर परीक्षेच्या तारखांबाबतची माहिती यापुर्वीच सर्व महाविद्यालयांना संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. दरवर्षी प्रमाणे उन्हाळी २०१७ परीक्षांच्या सर्व अभ्यासक्रमाच्या प्रश्नपत्रिका हया ऑनलाईन पध्दतीने पाठविण्यात येणार आहे.

सदर ऑनलाईन पध्दतीबाबत सविस्तर कार्यवाही महाविद्यालय स्तरावरुन करण्यात येणार असल्यामुळे तसेच उत्तरपुस्तीकांच्या मुल्यांकन कार्याबाबतची संपुर्ण माहिती देण्यासाठी **दि. ०९/०३/२०१७** रोजी प्रस्तुत विद्यापीठाच्या सिनेट हॉल मध्ये खालील दिलेल्या वेळापत्रकानुसार जिल्हानिहाय बैठक आयोजित करण्यात आलेली आहे.

उन्हाळी २०१७ परीक्षेसाठी ज्या महाविद्यालयास परीक्षा केंद्र म्हणुन निश्चीत करण्यात आलेले आहे त्याची यादी विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध असुन या यादीतील परीक्षा केंद्र प्रमुख /संबंधीत प्रतिनिधी/कर्मचारी यांनी उक्त बैठकीस उपस्थित राहुन उन्हाळी २०१७ परीक्षा कार्य सुरळीत पार पाडण्यासाठी सहकार्य करावे.

| जिल्हा | तारीख | वेळ |
|---|---|---|
| नांदेड व हिंगोली | ०९/०३/२०१७ | सकाळी ११:०० वाजता |
| परभणी व लातूर | ०९/०३/२०१७ | दुपारी ०२:०० वाजता |

वरीलप्रमाणे सर्व प्राचार्य/केंद्रप्रमुखांनी याची नोंद घेवुन आपण स्वतः/प्रतिनिधींना उपस्थित राहण्यासाठी नामनिर्देशित करावे.

कळावे,

आपला,

**संचालक,**
परीक्षा व मुल्यमापन मंडळ
प्रस्तुत विद्यापीठ.

**प्रत माहितीस्तव सादर :**
मा. कुलगुरू महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.
मा. प्र- कुलगुरू महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.
मा.कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ.
जनसंपर्क अधिकारी प्रस्तुत विद्यापीठ : यांना देवुन कळविण्यात येते की, सदर परिपत्रकानुसार दैनिक वर्तमानपत्रात बातमी प्रकाशित करावी.